## अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक १७/०५/२०२३ चे ००.०१ ते १६.०० वा.

➢ **दुखापत :-**

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पो स्टे गाडगे नगर अमरावती<br>अप क्र ६६१/२३ कलम ३२४,५०४,३४ भादवि | संस्कार लॉन लागुन पदेशी लस्सी आईसक्रीम अमरावती | दि १६-०५-२३ चे १०-०० वा दरम्यान<br>दि.१७-०५-२३ चे ०१-५४ वा | राजु साहेबराव पाल वय ४५ वर्षे रा संस्कार लॉन अमरावती | अज्ञात ३ आरोपी | यातील हकीकत अश्याप्रकारे आहे कि नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे परदेसी फेमस लस्सी व आईसक्रीम चा व्यवसाय करतो तसेच रात्री १०-०० वा दरम्यान दुकान बंद करीत असतांना दुकानावर ३ अज्ञात इसम वय अंदाजे २५ वयोगटातील आले व फि ला म्हटले कि महाराज तुमच्या गाडीमधील पेट्रोल कोणीतरी काढले त्यावर फी ने त्यांना म्हटले कि माझ्या जवळ गाडीच नाही तर पेट्रोल कोण काढणार असे म्हटल्यावरुन त्या मुलांनी फिर्यादीस शिविगाळ केली मी त्यांना म्हटले कि शिविगाळ करुन नका त्यावर त्यांना हटकले असता त्यातील एका मुलाने बाजुने पडलेली काठी उचलुन फि च्या डोक्यावर वरच्या बाजुला मारली व डाव्या हातावर मनगडावर मारले त्यामुळे डोक्यावर जख्म झाली व रक्त निघाले होते त्यानंतर मारणारे हे तेथुन पळुन गेले त्यांना फि हे ओळखत नाही ते कुठे राहतात फि ला माहीत नाही. अश्या फि चे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला |
| २. | पो. स्टे. राजापेठ अप क्र. ४५८/२३ कलम ३२४,३२३,५०६, ३४ भादंवि | अमरावती | दि. १६/५/२३ चे १८.३० वा .<br><br>दा. ता. वेळ दि. १७/५/२३ चे ००.५९ वा. | विलास गणेश वानखडे वय ३५ वर्ष रा अमरावती | १)पंकज एकनाथ बेलसरे, २)एक महिला | हकीकत अश्याप्रकारे आहे कि नमुद फिर्यादी व आरोपी क्र २ हे नातेवाईक असुन नमुद घटना ता. वेळी व ठिकाण फिर्यादीच्य घराच्या आवारात काम करत असतांना त्यांच्या घरात राहणारी फिर्यादीची बहिण आरोपी क्र.२ हिने फिर्यादीचे कमरेवर मागुन येवुन लाथ मारली व खाली पाडले नंतर आरापी क्र १ फिर्यादीचे जावाई यांनी लोखंडी रॉडने फीर्यादीचे डोक्यावर मारुन जखमी केले व कु-हाड ओठाजवळ मारुन जखमी केले व मारण्याची धमकी दिली. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |
| ३. | पो. स्टे. राजापेठ अप क्र. ४६०/२३ कलम ३२४,३२३ भादंवि | अमरावती | दि. १६/५/२३ चे २२.३० वा .<br><br>दा. ता. वेळ दि. १७/५/२३ चे ०२.३४ वा. | एक महिला | विक्की गणेश वानखडे रा अमरावती | हकीकत नमुद घटना ता वेळी यातील फिर्यादी ही दि १६.०५.२०२३ रोजी १७.३० वा दरम्यान घरी स्वयंपाक करीत असतांना फिर्यादीचा भाऊ दारु पिवुन येवुन शिवीगाळ केली व फिर्यादीच्या मुलाला थापडा मारल्या त्यावर फिर्यादीच्या पतीने विलास वानखडे थापडांनी मारहाण केली. त्या कारणावरुन २२.५० वा दरम्यान फिर्यादी हि तीच्या परिवारासह झोपण्याची तयारी करीत असतांना फिर्यादीचा दुसरा भाऊ विक्की वानखडे हा आला व माझे भावाला का मारले या कारणावरुन फिर्यादीच्या डाव्या हाताला व पाठीवर लोखंडी रॉडने मारुन जखमी केले त्यामुळे फिर्यादीच्या डाव्या हाताला मार लागुन रक्त निघु लागले तसेच फिर्यादीचे पती मधात गेले असता त्याना सुध्दा किरकोळ मार लागला. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |

## ➢ घरफोडी:-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पो स्टे गाडगे नगर अमरावती<br>अप क्र ६६२/२३ कलम ४५४,३८० भादवि | शिव नगर अमरावती | दि १६-०५-२३ चे ०८-०० वा ते १७-०० वा दरम्यान<br>दि १७-०५-२३ चे ०३-५० वा. | रमेश लक्ष्मणराव भोयर वय ६० वर्षे रा शिव नगर अमरावती शिवाजी महाराज यांचे पुतळ्याजवळ | अज्ञात इसम | थोडक्यात हकीकत अश्याप्रकारे आहे कि नमुद घ ता वेळी ठीकाणी यातील फिर्यादी हे गावाला गेले होते त्यांना राजु वावरे ठेकेदार याचा फोन आला व त्यांनी सागीतले की तुम्ही घराला कुलुप लावले नाही का त्यावर फि ने म्हटले कि मि कुलुप लावुन आलो होतो त्यानंतर फि ने राजु वावरे यांचे फोन वर व्हीडीओ कॉल करुन संपुर्ण घर दाखविले आलमारी उघडी दिसली यावरुन फि हे लगेच अमरावती ला आले व घरात जावुन पाहीले असता देव घरातील अलमारी उघडी दिसली त्यामध्ये ठेवलेली २ सोन्याची चैन वजन ५० ग्रँम कि अं १२५,०००/-रु चे २) ३ ग्रँम सोन्याच्या ाेता वजन १५ ग्रँम कि अ ३७,०००/-रु ३) २ जोड कानातील सोन्याचे रिंग वजन ४ ग्रँम कि अं ३५०००/-रु चे ४) ५ जोड कानातील सोन्याचे टॉप्स २० ग्रँम कि अं ५०.०००/-रु चे ५) ३ जोड कानातील बिर्या १५ ग्रँम ३७.५००/-रु ६) १ सोन्याचे लॉकेट २ ग्रँम कि अं ५.०००/-रु चे ७) ३ नग चांदीचे कडे ३० ग्रँम कि अं ६०००/-रु चे ८) २ नग पायातील पट्टया २० ग्रँम कि अं ४०००/-रु चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली अश्या पि चे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |

## ➢ वाहन चोरी :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पो स्टे गाडगे नगर अमरावती<br>अप क्र ६६३/२३ कलम ३७९ भादवि | रामपुरी कँम्प अमरावती | दि १४-०५-२३ चे २२-०० वा ते २३-०० वा दरम्यान<br>दि १७-०५-२३ चे ११-५५ वा | निर्मलकुमार खेमचंद धनकानी वय ५० वर्षे रा कटारीया यांचे घरा भाड्याने रामपुरीकँम्प अमरावती | अज्ञात इसम | हकीकत अश्याप्रकारे आहे कि नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फि यांनी त्याचे आत्याचा मुलगा बजाज यांचेकडुन त्याचे मालकीची दुचाकी ड्रीम युगा काळ्या रंगाची MH २७ AV ५२९६ चालविण्यासाठी घेतली होती यातील नमुद घ ता वेळी व ठिकाणी त्याची ताब्यातील होंडा ड्रीम युगा काळ्या रंगाची Mh २७ AV ५२९६ हिचा इंजीन क्र JC५८E११९०५४० व चेसीस क्र ME४JC५८३KC५८३KC८१११०६७ अशी कि अं १००००/-रु ची कोणीतरी अज्ञात इसमाने चोरुन नेली .अश्या फि चे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २. | पो. स्टे. राजापेठ अप क्र. ४५९/२३ कलम ३७९ भादंवि | देशी दारुचे दुकान गोंडबाबत मंदीराजवळ एमआयडीसी अमरावती | दि. ११/५/२३ चे २०.०० वा . दा. ता. वेळ दि. १७/५/२३ चे ०१.२० वा. | विजय किसनराव तायडे वय ४५ वर्ष रा सरोज कॉलनी सुतगिरणी रोड अमरावती | अज्ञात | हकीकत नमुद फिर्यादी हे त्यांची मोटार सायकल घेवुन दिनांक ११.०५.२०२३ रोजी रात्री २०.०० वा. सुमारास पुनम करण जयस्वाल देशी दारुचे दुकान गोंडबाबा मंदीराजवळ एमआयडीसी रोड अमरावती येथे हिरो कंपनीची काळया रंगाची त्यावर पर्पल रंगाचे पटटे असलेली मोटार सायकल क्र **MH27AW1523** इंजीन क्र **HA11EFC9M44647** चेसीस क्र **MBLHA11EWC9M45724** कि अं **30,000/-** रु. देशी दारुच्या दुकानासमोर लावुन दुकानाच्या आत जावुन परत आले असता मोटार सायकल लावलेल्या ठिकाणी दिसुन आली नाही. आजुबाजुला शोध घेतला मिळुन आली नाही. ती कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |
| ३. | पो. स्टे. राजापेठ अप क्र. ४६१/२३ कलम ३७९ भादंवि | गणेश नगर सुतगिरणी रोड अमरावती | दि. १५/५/२३ चे १३.३० वा . ते १८.०० वा दरम्यान दा. ता. वेळ दि. १७/५/२३ चे १३.४७ वा. | प्रथमेष नरेश अंबुरे वय २३ वर्ष रा गणेश नगर सुतगिरणी रोड अमरावती | अज्ञात | हकीकत नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी याने आपली **TVS** विक्टर मोटार सायकल काळया रंगाची सिल्वर पटटा असलेली क्र **MH27BU8951** इंजीन क्र **EFIAH1662366** चेसीस क्र **MD625MF1941A60135** कि अं **20,000/-** रु. असलेली घरासमोर उभी करुन ठेवली असता संध्याकाळी जिमला जाण्याकरीता निघालो असता ठेवलेल्या ठिकाणी नमुद वर्णनाची मोटार सायकल मिळुन आली नाही. आजुबाजुला शोध घेतला मिळुन आली नाही. ती कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |

## ➢ चोरी :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| ४. | पो स्टे गाडगे नगर अमरावती<br>अप क्र ६६४/२३ कलम ३७९ भादवि | सरस्वती नगर अमरावती | दि १६-०५-२३ चे १८-०० वा दरम्यान<br>दि १७-०५-२३ चे १४-५८ वा | तनविर अहमद खा शकील खा वय ३२ वर्षे रा झम झम नगर अमरावती | अज्ञात इसम | हकीकत अश्याप्रकारे आहे कि नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील पि चे व्यापारी संकुल मध्ये तळमजलावर ०९ नंबर चे दुकान असुन त्यामध्ये सोनु कार पार्लर या नावाने दुकान चालविते नमुद दुकानावर मि डीजीटल बोर्ड अंदाजे १८०० वा रुपया मध्ये बनविला होता बोर्ड दि १६-०५-२३ प्रयंत दुकानावर लागला होता दि १७-०५-२३ रोजी सकाळी ११-०० वा फि हे दुकान घडण्याकरीता आली असता तेव्हा डिजीटल बोर्ड दिसुन आले नाही नमुद बोर्ड कुणीतरी अज्ञात इसमाने चोरुन नेल्याचे दिसुन आले डिजीटल बोर्ड लाल रंगा मध्ये सोनु कार पार्लर असे लिहीले होते अश्या पि चे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |

## विश्वासघात (फसवणुक) :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. (गुन्हेगारी पुर्व ईतिहास) | आरोपीचे नाव व पत्ता (गुन्हेगारी पुर्व ईतिहास) | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | नांदगावपेठ अप क्र १८१/२०२३ कलम ४२०,३४ भादवी | मोजे रहाटगाव शेत सर्वे नं.५९/१ अ व ६१ ड्रिमलंन्ड जवळ | दि.१८/०१/२०२३ ते १९/०१/२०२३ चे १८/०० वा. दा.ता.वेळ दि.१७/०५/२०२३ चे १५/२४ वा.दरम्यान | नरेद्र गोपीचंद भारानी वय ४४ वर्ष धंदा व्यापार रा.गोपीनंदन नाशिककर प्लाट छत्री तलाव रोड अमरावती | १)संजय प्रेमचंद हरवान्री वय ५२ वर्ष २) एक महीला अमरावती | हकीकत अशा प्रकारे ओह की ,मी समक्ष हजर येवुन जबानी रिपोर्ट देतो की,नरेद्र गोपीचंद भारानी ड्रिम्ज इन्फारस्ट्रक्चर पेढीचा भागीदार आहे.सन २०२०मध्ये गेरअर्जदारक्र १ व २ हे नमुद पेढीमध्ये निवृत्त झाले आहे. गैर्जदार निव्रत्त झाल्यानतर मी व माझा भाऊ मनोज गोपीचंद भाराणी असे आम्ही दोघे संपुर्ण व्यवहार पाहतो. आम्ही ड्रिम्स इन्फ्रास्टँक्चर पेढीचा भागिदार चे नावे नागपुर अमरावती रोडवर मौजे बोरगाव धर्माळे ता. जि. अमरावती शंत सर्वे नं. ८७,८८,११९,१८३,१३४,१३८,१३९,१४०,१४२ व १४४ असे सर्व गट मिळुन शेत जमिन विकत घेवुन त्यामध्ये भुखंड पाडले होते. ज्यामध्ये मी सब डिव्हीजन करुन १ ते ७ प्लॉट पाडुन त्यावर व्यापार संकुला करीता बांधकाम करुन विकसीत केले आहे. प्लॉट क्र. १ त्याचे क्षेत्रफळ १,०१,६२८.१५ चौ. मी. तसेच प्लॉट क्र. ६ चे क्षेत्र १७,८९९.३४ चौमी असे आहे. ती संपुर्ण जागा माझ्या मालकीची व ताब्यात आहे. नमुद प्लॉटची पश्चिम बाजुस आमचे जागेवर सिमांकन हद्दीत खाजगी रोड असुन कोणताही सार्वचनिक रोड ऩाही. माझेवर नमुद प्लॉटचे लगत पश्चिम बाजुस अम. महा. पालिका अंतर्गत मौजे रहाटगाव शेत सर्वे नं ५९/१ अ व ६१ असे दोन लगत चे सर्वे नंबर आहेत. सदरची जमीन आमची दुसरी कंमनी ड्रिम्स इन्फ्राव्हीजन तर्फे भागिदार मी व गैरअर्जदार संजय प्रेमचंद हरवानी यांचे नावे खरेदी केली होती. त्यानंतर नमुद जमीन खरेदी दस्त क्र. ३५३६/२० दि. ०४/१२/२०२३ गैरअर्जदार क्र. १ व २ यांनी विक्री केली आहे. नमुद जागेची सिमांकन काय आहे व तेथे सार्वजनिक रस्ता नाही. त्याबाबत संपुर्ण माहीती गैरअर्जदार यांना होती.गैरअर्जदार यांनी त्यांचे मालकीची मौजे रहाटगाव शेत सर्वे नं. ५९/१ अ व ६१ या जागेवर ले आऊट टाकत आहे.महाराष्ट् प्रादेशिक नगर नियोजन अधीनियम अंर्तगत यु.डि.पि.एस आर अंर्तगत गैरअर्जदार यांना ले आऊट टाकायचे असेल तर त्यांना त्यांचे ले आऊट मध्ये १२ मी.रुंद रस्ता स्वतहाच्या जागेमध्ये ठेवणे बंधनकारक आहे.परंतु गैरअर्जदार यांनी सहाय्यक संचालक नगर रचना महानगर पालीका यांना नमुद`ल आऊट करीता नकाशा सादर करुन माझे मालकिचे जागेवर सार्वत्रिक ले आऊट मध्ये ६ मी.रुंदीचा रस्ता दाखवुन स्वतहाचा लाभ होण्याच्या उदेशाने व मला आर्थीक नुकसान होण्याच्या उदेशाने तो नकाशा हेतु पुरस्पराने समक्ष अधीकारी यांना दाखवुन तात्रीक मंजुरी घेतली आहे.गैरअर्जदार यांना स्पस्ट माहीती असतांना माझे मालकिच्या असलेल्या अकृषक प्लाँटवर कोणताही सार्वजनिक रस्ता नसताना सुद्धा त्यांना गैरकायदेशीर फायदा व्हावा व आम्हाला ,इतर लोकाना ,शासनाला गैरकायदेशी नुकसान व्हा वे या उदेशाने गैरअर्जदार यांनी माझे ले आऊटमध्ये चुकीचा ले आऊट दाखवुन यांची नगर रचना कार्यालय महानगर पालीका अमरावती येथुन मंजुरी घेवुन समक्ष अधीकारी यांचा दिशाभुल करुन माझा सुध्दा फसवणुक केली आहे.अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | पो स्टे गाडगे नगर अमरावती<br>अप क्र ६६०/२३ कलम ४२०, भादवि ६६(सि) आट टी अँक्ट | जयसियाराम नगर अमरावती | दि १४-०५-२३ चे १८-०० वा दरम्यान<br>दि १७-०५-२३ ००-२२ वा | निखिल सिताराम साहु ववय ३१ वर्षे रा जयसियाराम नगर अमरावती | चन्द्रशेखर रा शॉप न ०४ ऑक्स खॉन्टम मॉल सेक्टर ५१ गुरुग्राम हरीयाणा १२२०१८ | यातील पिर्यादी हे काही दिसापासुन जनार्दन पेठ अमरावती येथे राजेन्द्र गट्टानी अँड असोसिएट्स येथे कॉम्पुटर ऑपरेटर म्हणुन काम करतो फि हे फ्लीपकार्ट अँप काही दिवसापासुन वापरत आहे फी ला फ्लीपकार्ट तर्फे ७० हजार रुपयाचे केर्डीट लिमिट दिल्या गेली या दरम्यान HDFC बँक आणी फ्लीपकार्ड कंपनी तर्फे फि ला खात्यातुन व्यवहाराची माहीती मिळाली पण त्यावर फि ने लक्ष दिले नाही या नंतर गैरअर्जदार याने अंपल क्ंपनिचे ५९,०००/- रु ची शॉपींग केल्याचे माहीत पडले गैरअर्जदाराने फसवणुकीचे प्रॉड्कट ऑर्डर आय डी क्र ३२८०५८८६६३५५४६५१०० ने १४ मे २०२३ टे सायकांवी ०६-१० हे फि ला त्याचे राहते घरी प्राप्त तेलस्याची माहीती फ्लीपकार्ट अँप वरुन माहीती पडला .गैर्जदार माझे परीचीक असतांना सुद्धा त्यांनी माझ्या क्रेडीट लिमिट मधुन ५९,०००/- रु चे ऑयपँड खरेदी करुन फसवणुक झाली .अश्या पि चे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला |

## ➢ ईतर :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पो. स्टे. राजापेठ अप क्र. ४६२/२३ कलम १८८,२७२, २७३,३२८ भादंवि सहकलम २६(१),२६(२)(iv),२७(३)(e), ३०(२)(a), ३(१)(zz)(v) अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ | पान कॉर्नर भक्तीधाम समोर डि मार्ट जवळ अमरावती | दि. १७/५/२३ चे १२.४५ वा .<br>दा. ता. वेळ दि. १७/५/२३ चे १५.०९ वा. | एक महीला अमरावती | श्याम चक्रभुज पवार वय ४३ वर्ष रा जवाहर गेट लखारी गल्ली अमरावती | हकीकत नमुद आरोपी हा महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत अन्न पदार्थ गुटखा असलेला विक्री करीता पान सेंटर मध्ये साठा करीत असल्याचे दिसुन आले वरुन सदर ठिकाणी पोना/६३८ रवी लिखीतकर व पो स्टाफ यांनी जावुन पाहणी केली असता एकुण ९४८०/- रुपयांचा प्रतीबंधीत गुटखा मिळुन आला वरुन त्यांनी अन्न सुरक्षा अधिकारी यांनी माहिती दिली त्यांनी सदर घटनेचा पंचनामा करुन नमुद आरोपी विरुध्द लेखी फिर्याद दिल्याने आरोपीविरुध्द कलम १८८,२७२,२७३,३२८ भादंवि सहकलम २६(१),२६(२)(iv), २७(३)(e), ३०(२)(a), ३(१)(zz)(v) अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ प्रमाणे असल्याने अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला, |

## ➢ अकस्मात मृत्यु :-

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण | चौकशी अधिका-यांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | पो. स्टे. राजापेठ ४९/२३ कलम १७४ जाफौ | वात्सल्य विद्या मंदीराच्या पहिल्या माळयावर गणेशनगर जवळ शंकर नगर अमरावती दि. 16.05.2023 चे 22.15 वा, दि. 17.05.2023 चे 09.34 वा. | विनोद रमेश व-हाडे, वय 35 वर्ष रा कळमजापुरता चांदुर रेल्वे जि अमरावती | लखन दिपक लोखंडे वय 33 वर्ष, रा वात्सल्य विद्या मंदीराच्या पहिल्या माळयावर गणेशनगर जवळ शंकर नगर अमरावती | हाताला काच लागुन जख्मी झाल्याने अती रक्तस्त्राव झाल्याने मृत्यु | यातील फिर्यादी यांनी पो स्टे ला येवुन जबाणी रिपोर्ट दिला की, ते नमुद पत्यावर इतर 7 कारागीरांसह राहत आहे. नमुद पत्यावर सचिन मनोहर हांडे वय 35 वर्ष यांचे मालकिच्या हिऱ्याला पैलु पाडण्याचा कारखाना असुन आम्ही सर्व तेथे सकाळी 08.00 वा ते 08.00 वा पर्यंत काम करतो व तेथेच रात्री झोपतो. दिनांक 16.05.2023 रोजी आम्ही 09.30 वा. च्या सुमारास सर्व पाहिल्या माळयावर 4 जन झोपलो होतो त्यामध्ये मी व सुधाकर मोतीराम आखरे, सुरेश किसन वाघमारे व विनोद रामेश्वर वऱ्हाडे असे होते तसेच वर मोकळया जागेत संजय भालेराव व गजानन शंकर भोयर असे झोपले होते. रात्री 10.15 वा. चे सुमारास काच फुटल्याचा आवाज आला असता मी आवाजाच्या दिशेने जावुन पाहिले असता विनोद रामेशवर वऱ्हाडे वय 35 वर्ष हा हाताला पकडुन होता त्याच्या उजव्या हातातुन रक्ताची धार येत होती मी त्याच्या जवळ जाताच त्याने मला काच लागली माझा हात पकड मला चक्कर येत आहे. असे सांगुन तो खाली बसला तेथे लगेच झोपेतुन उठुन सुधाकर मोतीराम आखरे व बाहेरुन योगश अनिल राऊत हे आले आम्ही सर्वांनी जखमेला टॉवेल बांधला व एकाने ॲबुलन्सला फोन केला तसेच एकाने मालकाला फोन करुन माहिती दिली मालक बाजुनच राहत असल्यामुळे लगेच वर आले मालकाने व त्याच्या मित्रंनी गाडी बोलावली व त्यानी आम्ही जखमी विनोद वऱ्हाडे यास इर्विन हॉस्प्पीटल येथे घेवुन गेलो तेथे डॉक्टरांनी उपचार केले असता जखमी मयत झाल्याचे सांगितले अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट व मेमो क्र 2191 प्राप्त झ ाल्यावरुन सदरचा मर्ग दाखल केला. | पोहवा/880 निलेश वानखडे पो स्टे राजापेठ, अमरावती शहर |

➢ **जुगार रेड :-**

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| १ | पो.स्टे.फ्रेजरपुरा अम.शहर | अप क्र.३५४/२०२३ कलम १२(अ) म.जु.का. | शुक्रवार बाजार चपराशीपुरा मागील मैदान अमरावती | दि.१६/०५/२०२३ चे २१.३०वा. | दि.१७/०५/२०२३ चे ००.०९वा. | सरतर्फे पो.हे.कॉ. योगेश श्रीवास ब.नं.१०१५ पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर | १)शेख इम्रान शेख गुफरान वय २१ वर्ष,रा. चपराशीपुरा सागर नगर अमरावती , २) दिपक गणपतराव गवळी वय ३९ वर्ष, रा. अंधविद्यालय गजानन नगर बिच्छु टेकडी अमरावती, ३)राहुल अरुण लोणारे वय २७ वर्ष, रा. बेलपुरा हनुमान मंदीरा जवळ अमरावती, ४) फरार आरोपी - रियाज खान वल्द हयातखान वय ५४ वर्ष, रा. चपराशीपुरा सागर नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद फिर्यादी हे पो.स्टे. फ्रेजरपुरा येथे तैनातीस असुन पो.स्टे. फ्रेजरपुरा अमरवाती शहर येथे डि.बी पथक प्रमुख कामकाज पाहतात ते पो.स्टे लला हजर असतांना त्यांना मा. पोलीस आयुक्त सा.यांचे विशेष पथकातील पोउपनि गजानन राजमल्लु सा. यांनी माहीती दिल्यावरुन नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी नमुद आरोपी क्र.१ व२ हे लोकांन क़डुन पैसे घेवुन वरली मटका आकडे लिहुन चिठ्या देतांना मिळुन आले तसेच आरोपी क्र.०३ हा वरली मटका लावणारा हा जागीच मिळुन आला व वरली मटका खेळ खेळविणारा माल असुन तो तो पोलीसांना पाहुण पळुन गेला आरोपी क्र.१ ते ०३ याचे वर जुगार रेड केली असता त्याचे ताब्यातुन १)वरली मटका आकडे लिहिलेल्या कागदी चिठ्या, २) २नग निळया शाईचे बॉलपेन कि.अं.१०/-रु., ३)नगरदी २९००/-रु. असा एकुण २९१०/-रु.चा जुगार माल व साहीत्य मिलुन आला आरोपीतांचे कृत्य कलम १२ अ म.जु,का.प्रमाणे होत असल्याने त्याचेविरुध्द कारयदेशीर फिर्यादी आहे अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |
| २ | बडनेरा | अप क्र.३५३/२०२३ कलम १२ अ | आठवडी बाजार नवी वस्ती, बडनेरा. | दि. १७/५/२३ चे १२.०० वा दरम्यान | दि. १७/५/२३ चे १९.५१ वा | पोउपनि तुषार गावंडे सा पो.स्टे. बडनेरा.अम. | शेख शहबाज शेख इद्रीस वय -२० वर्षे, रा. इंदीरा नगर , नवी वस्ती, बडनेरा | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांनी गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीतीप्रमाणे पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर जुगार रेड केली असता त्याच्या ताब्यातुन नगदी २२००/-रु.एक बॉल पेन कि.अं.०५ रु.०१ ते १० आकडे लिहलेले वरली आकडे चिठठी कि.अं.२२०५ रु. चा माल मिळुन आला. वरून सदरचा गुन्हा दाखल केला |

➤ **प्रोव्हीशन रेड :-**

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| १. | बडनेरा | अप क्र.३५०/२०२३ कलम ६५( ई ) (फ) | आरोपीचे घरासमोर , पारधीबेडा ग्राम मोगरा ता. जि. अमरावती . | दि. १७/५/२३ चे ०६.३० वा दरम्यान | दि. १७/५/२३ चे ११.२८ वा | *ना.पो.का. मंगेश परिमल, ब.न. ३३४ पो.स्टे. बडनेरा.अम.* | दिलीप अवघ्या भोसले , वय ५५ वर्षे, रा. पारधीबेडा , बडनेरा | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी दि.१६.०५.२०२३ रोजी सकाळी ०६.०० वा पासुन मा.पोनी श्री मगर सा. सपोनी इंगोले ,पोउपनि मारोडकर , गांवडे पोस्टेचे स्टाफ व आर.सी.पी पथक महीला अंमलदार म पो कॉ.१५९९, १७२३,११०१, १४५७ सह ग्राम मोगरा येथे प्रोव्हीशन रेड डयुटी असता ०६.३० वा दरम्यान बस स्टॅड मोगरा हा आपल्या घराच्या बाजुला मोकळया जागेत अवैध रित्या गावठी हातभटटी दारु गाळया उपयोगी मोह माच सळवा व विक्री करीता गावठी हा.भ दारु बाळगत आहे. अश माहीती वरुन पंचनाम्यातील पंच व आम्ही पो. स्टाफ असे खबरेप्रमाणे पायदळ दिलीप भोसले यांच्या घराकडे गेलो असता दुरुनच एक इसम घराच्या बाजुला मोकळया जागेत प्लॉटीकचे डाम मध्ये लाकडी काठीफिरवतांना दिसुनआला त्याला पोलीस येत असल्याचे चाहुल लागताच तो घटनास्थळावरुन पळुन जात असता त्यास पंच आम्ही व स्टाफने ओळखले तो दिलीप अवघ्या भोसले , वय ५५ वर्षे, रा. पारधीबेडा , बडनेरा त्याचा पाठलाग पो कॉ.३५२ यांनी केला असता तो जंगलाच्या रस्ताने ापळुन गेला पंचासमक्ष जप्ती पंचनाम्याप्रमाणे तीन मोठे प्लास्टीक ड्रम ज्यामध्ये अंदाजे ६०० लीटर मोहमाच सडवा दहा लहान प्लॉस्टीक ड्रम ज्यामध्ये प्रत्येकी १०० लीटर पाणी मिश्रीत मोहमाच सडवा असा एकूण १६०० लीटर पाणी मिश्रीत मोहमाच सडवा प्लॉटीक ड्रमसह किंमत अंदाजे ४२,००० रु व एका दहा लीटरच्या प्लॉटीक डबकीमध्ये २० लीटर हा भ.दारु डबकीसह किंमत अंदाजे ४२०० असा एकुण ४६,२०० रुपयाचा प्रोव्हीशन माल मिळुन आलयाने पंचासमक्ष जप्त केला जप्त पाणी मिश्रीत मोहाचा सडवा व गावठी ह भ च्रया दारु मधुन प्रत्येकी १८० मिली काचेच्या चापट शिशीमध्ये भरुन त्याचेवर माझे व पंचाचे कागदी लेबल लावुन त्यावर पोस्टेचे सिलचे लाखेचे सिल करुन ते सि. ए सॅम्पल करीता वेगळे राखण्यात आले उर्वरीत मोहाचा सडवा व गावठी हातभटटीचे दारु व प्लास्टीकचे ड्रम पोस्टेला आणण्याकरीता साधन नसल्याने व रस्ता अडचणीचा असल्याने घटनास्थळीच एका बाजुला टाकुन नाश करण्यात आले असे प्लास्टीक ड्रम फोडुन नाश करण्यात आले वरील आरोपीचे कत्य कलम ६५ ( ई ) (फ) महा दारु बदी कायदा प्रमाणे होत असल्याने त्याच्याविरुध्द गुन्हा दाखल होण्याकरीता माझी कायदेशीर फिर्याद सादर आहे वरून सदरचा गुन्हा दाखल केला. |
| २. | बडनेरा | अप क्र.३५१/२०२३ कलम ६५ ( ई ) (फ) | आरोपीचे घरासमोर , पारधीबेडा ग्राम मोगरा ता. जि. अमरावती . | दि. १७/५/२३ चे ०७.१५ वा दरम्यान | दि. १७/५/२३ चे ११.४७ वा | *पोहेकॉ अब्दुल रहीम अब्दुल कदीर ब.न. २२ पो.स्टे. बडनेरा.अम.* | गुलाब शिवताराश पवार, वय ३५ वर्षे, रा. पारधीबेडा , बडनेरा | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी दि.१६.०५.२०२३ रोजी सकाळी ०६.०० वा पासुन मा.पोनी श्री मगर सा. सपोनी इंगोले ,पोउपनि मारोडकर , गांवडे पोस्टेचे स्टाफ व आर.सी.पी पथक महीला अंमलदार म पो कॉ.१५९९, १७२३,११०१,१४५७ सह ग्राम मोगरा येथे प्रोव्हीशन रेड डयुटी असता ०६.३० वा दरम्यान बस स्टॅड मोगरा हा आपल्या घराच्या बाजुला मोकळया जागेत अवैध रित्या गावठी हातभटटी दारु गाळया उपयोगी मोह माच सळवा व विक्री करीता गावठी हा.भ दारु बाळगत आहे. अश माहीती वरुन पंचनाम्यातील पंच व आम्ही पो. स्टाफ असे खबरेप्रमाणे पायदळ गुलाब शिवताराश पवार यांच्या घराकडे गेलो असता दुरुनच एक इसम घराच्या बाजुला मोकळया जागेत प्लॉटीकचे डाम मध्ये लाकडी काठीफिरवतांना दिसुनआला त्याला पोलीस येत असल्याचे चाहुल लागताच तो घटनास्थळावरुन पळुन जात असता त्यास पंच आम्ही व स्टाफने ओळखले गुलाब शिवताराश पवार, वय ३५ वर्षे, रा. पारधीबेडा , बडनेरा त्याचा पाठलाग पो कॉ.९४५ यांनी केला असता तो जंगलाच्या |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | रस्ताने पळुन गेला पंचासमक्ष जप्ती पंचनाम्याप्रमाणे दोन मोठे प्लास्टीक ड्रम ज्यामध्ये अंदाजे ४०० लीटर मोहमाच सडवा दहा लहान प्लॅस्टीक ड्रम ज्यामध्ये प्रत्येकी १०० लीटर पाणी मिश्रीत मोहमाच सडवा असा एकूण १६०० लीटर पाणी मिश्रीत मोहमाच सडवा प्लॉटीक ड्रुमसह किंमत अंदाजे ६०,००० रु व एका दहा लीटरच्या प्लॉटीक डबकीमध्ये १० लीटर हा भ.दारु डबकीसह किंमत अंदाजे २२०० असा एकूण ६२,२०० रुपयाचा प्रोव्हीशन माल मिळुन आलयाने पंचासमक्ष जप्त केला जप्त पाणी मिश्रीत मोहाचा सडवा व गावठी ह भ ऱया दारु मधुन प्रत्येकी १८० मिली काचेच्या चापट शिशीमध्ये भरुन त्याचेवर माझे व पंचाचे कागदी लेबल लावुन त्यावर पोस्टेचे सिलचे लाखेचे सिल करुन ते सि. ए सॅम्पल करीता वेगळे राखण्यात आले उर्वरीत मोहाचा सडवा व गावठी हातभटटीचे दारु व प्तास्टीकचे ड्रम पोस्टेला आणण्याकरीता साधन नसल्याने व रस्ता अडचणीचा असल्याने घटनास्थळीच एका बाजुला टाकुन नाश करण्यात आले असे प्लास्टीक ड्रम फोडुन नाश करण्यात आले वरील आरोपीचे कत्य कलम ६५ ई फ महा दारु बदी कायदा प्रमाणे होत असल्याने त्याच्याविरुध्द गुन्हा दाखल होण्याकरीता माझी कायदेशीर फिर्याद सादर आहे वरून सदरचा गुन्हा दाखल केला. |
| ३. | बडनेरा | अप क्र.३५२/२०२३ कलम ६५ ई | गजु मोहोड यांचे घराचे मागे कंम्पासपुरा जुनी स्ती, बडनेरा. | दि. १७/५/२३ चे १०.०० वा दरम्यान | दि. १७/५/२३ चे १२.१५ वा | *पोहेकॉ अब्दुल रहीम अब्दुल कदीर ब.न. २२ पो.स्टे. बडनेरा.अम.* | संदेश कैलाश उंबरकर, वय २२ वर्षे, रा. कंम्पासपुरा जुनी वस्ती, बडनेरा | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादीने पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर प्रो. रेड केला असता त्याच्या ताब्यातुन अवैधरित्या विनापरवाना १२ नग देशी दारूबाँबी संत्रा च्या प्रत्येकी १८० ml पावट्या, कि.अं. ८४०/- रू चा मुद्देमाल मिळुन आला. वरून सदर आरोपीवर सदरचा गुन्हा दाखल केला. |